भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# -: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :-

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

## कालावधी (दिनांक १९.०६.२०१९ ते २३.०६.२०१९)

| अंक ४९/२०१९ | दिनांक १८.०६.२०१९ | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (१२/०६/२०१९ ते १८/०६/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पुर्वानुमान (वैधता १९/०६/२०१९ ते २३/०६/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२/०६ | १३/०६ | १४/०६ | १५/०६ | १६/०६ | १७/०६ | १८/०६ | दिनांक | | १९/०६ | २०/०६ | २१/०६ | २२/०६ | २३/०६ |
| १६.४ | २५.८ | ९०.६ | ५.६ | ५.० | ०.० | १२.२ | पाऊस (मि. मी) | | २१ | ४० | २५ | १८ | १६ |
| ३४.५ | २८.५ | ३१.५ | ३३.० | ३३.५ | ३३.५ | ३३.५ | कमाल तापमान (अं. से) | | ३४ | ३४ | ३४ | ३४ | ३३ |
| २४.० | २३.० | २४.० | २४.० | २५.० | २५.० | २४.० | किमान तापमान (अं. से) | | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | ढगाळ | सकाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) | ८ | ६ | ६ | ७ | ८ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | दुपार | | | | | | |
| ९३ | ९५ | ९२ | ८५ | ९२ | ९२ | ९२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ८८ | ८७ | ८६ | ८५ | ८५ |
| ९२ | ९७ | ६६ | ७० | ६२ | ६१ | ८५ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ६२ | ६७ | ६४ | ६५ | ६६ |
| ३.५ | ०.५ | १.६ | २.० | १.८ | १.६ | १.६ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | | ००७ | ००७ | ००४ | ००५ | ००८ |
| नैऋत्ये | स्थिर | स्थिर | नैऋत्ये | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ | वा-याची दिशा | दक्षिणे कडून | दक्षिणे कडून | दक्षिणे कडून | दक्षिणे कडून | पश्चिमे कडून |
| नैऋत्ये | पुर्वे | दक्षिणे | पुर्वे | पुर्वे | पुर्वे | दक्षिणे | दुपार | | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | १७७.८ | १७७.८ | १५५.६ |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्हयात मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात, नागली | रोपवाटीका व्यवस्थापन व पेरणी | या आठवड्यात मध्यम पाऊस पडण्याची शक्यता असल्याने खरिप पीकांच्या पेरणीस सुरुवात करावी. भातासाठी रोपवाटिका तयार करावयाच्या क्षेत्रामध्ये प्रती गुंठा १ किलो युरिया, ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट व चांगले कुजलेले शेणखत द्यावे. बियाण्यास प्रती २ ग्रम याप्रमाणे थायरम किंवा इमिसान हे औषध चोळावे. वाफ्यावर पेरणी करताना ७ ते ८ सेमी अंतरावर ओळीमध्ये साधारण २ सेमी खोलीवर बी पेरावे आणि ते झाकुन घ्यावे. जाड दाण्याच्या जातीकरीता ४० किलो तर संकरीत जातीकरीता २० किलो बियाणे वापरावे. नागली आणि वरी पीकांची पेरणी देखील भाताप्रमाणे करावी व बियाणे विरळ पेरावे त्यामुळे रोपे जोमदार होतील.<br>भात रोपवाटीकेतील तणांच्या नियंत्रणाकरीता पेरणीनंतर वाफे ओले होताच ताबड्तोब किंवा ५ ते ६ दिवसांपर्यंत परंतु तणे उगविण्यापुर्वी ब्युटॅक्लोर ५% क्रियाशिल घटक (मॅचेट) हे तणनाशक ६० मिलि प्रती १० लि. पाणी या प्रमाणात मिसळुन फवारणी करावी. फवारणी करताना पाठीवरच्या नॅपसॅक पंपाने मागे सरत फवारणी करावी.<br>ज्या ठिकाणी गादि वाफे करणे शक्य नसेल तर रोपे तयार करण्यासाठी शेतातील उंचवठ्याची जागा निवडावी. व चारही बाजुंनी खोल चारी काढावी यामुळे पाऊस जास्त झाला तरी पाण्याचा निचरा होण्यास मदत होईल व कोवळी रोपे मरण्याचे प्रमाण कमी राहिल.<br>भात रोपवाटीकेमध्ये पाणी मोठ्या प्रमाणात साचुन राहिल्यास अतिरीक्त पाण्याचा निचरा करावी. |
| भुईमुग | पुर्व मशागत व पेरणी | पावसाचा अंदाज घेवुन भुईमुग लागवडीसाठी शेताच्या पुर्वतयारीची कामे हाती घ्यावीत. त्यासाठी जमिन खोल नांगरुन भुसभुशीत करावी व शेवटच्या कुळवणीपुर्वी हेक्टरी १० टन चांगले शेणखत किंवा कंपोस्ट मिसळावे. डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठाने शिफारस केलेल्या कोकण गौरव व ट्रॉम्बे कोकण (टपोरा) तसेच टी.जी.२६, टी.ए.जी. २४, टी.पी.जी. ४१ या जातींची निवड करावी. प्रती हेक्टरी १०० ते १२५ किलो बियाणे वापरावे.<br>मर रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी थायरम ३ ग्रॅम/किलो या प्रमाणात चोळावे.<br>खरीप हंगामातील भुईमुगाची पेरणी १० ते २० जुन पर्यत करावी. या आठवड्यात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असल्याने भुईमुगाच्या पेरणीची पुर्व तयारी करावी परंतु पाऊस कमी झाल्यानंतर पेरणी करावी. |
| आंबा | नवीन लागवड | आंबा कोय-कलमे तयार करण्यासाठी ताजे बाटे उपलब्ध करुन घ्यावेत व गादी वाफ्यावर रुजत घालावेत. पेरणीपुर्वी बाटे पाण्याने स्वच्छ धुवुन कार्बेडॅझिम हे बुरशीनाशक १ ग्रम/ली. पाणी या प्रमाणात मिसळुन या द्रावणाची प्रक्रिया करावी. यामुळे बुरशीचे प्रमाण कमी होऊन मर कमी होते.<br>आंबा रोपवाटीकेत रुजलेल्या आंबा बाट्यावर कलमे बांधण्याची प्रक्रिया सुरु करावी. |
| काजु | नवीन लागवड | काजुवर खोडकिडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी.लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. काजुमध्ये काढणीनंतर जुन्या व रोगट फांद्या कापून त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे. |
| नारळ | फळधारणा | नारळावरील गेंड्या भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी प्रादुर्भावग्रस्त माड साफ करुन सर्वात वरील पानांच्या बेचक्यात २% मिथील पॅराथिऑन पावडर ५० ग्रम + ५० ग्रम वाळु यांचे समप्रमाणात मिश्रण करुन भरावे. बागेमध्ये शेणखताच्या खड्यात अळ्यांना मारण्यासाठी ५०% कार्बारिल भुकटी ४० ग्रम प्रति १० लि. पाण्यात मिसळुन फवारावी. |
| भाजीपाला | रोपवाटीका व्यवस्थापन व पेरणी | भाजीपाला पीकांमध्ये मिरची, वांगी, टोमॅटो, भेंडी, काकडी, कारली, पडवळ, चिबुड, शिराळी ई. पीकांची लागवड करण्यास योग्य हवामान असुन पाऊसाचा अंदाज पाहून पेरणी करावी. तसेच पेरणीसाठी सुधारीत जातीचे बियाणे वापरावे. भेंडीची लागवड सरी-वरंब्यावर करावी. वेलवर्गीय भाजीपाला पीकांसाठी मातीचे ऊंचवटे करुन त्यावर मध्यभागी लागवड करावी. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.

| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उदयानविदया महाविदयालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी संशोधन संचालक/नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>प्रा.फ.सं.के. वेंगुर्ले, जि. सिंधुदर्ग<br>(०२३६६-२६२२३४, २६२६९३) | डॉ. यशवंत चं. मठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उदयानविदया महाविदयालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) |
|---|---|---|